# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>
## प्रेस नोट दि.२६/०७/२०१८
## <u>दि.२५/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २४८/१८,भादविक ४०६,४०८,४२०,४६५,४६७,४६८,४७१,३४, महाराष्ट्र ठेवी दारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम सन १९९९ चे कलम ३ |
| **फिर्यादी** | राजाराम शेळके,वय-५७ वर्षे,रा.स.नं.८४,गायकवाड वस्ती,मुंढवा,पुणे |
| **आरोपी** | श्री.नवलोबानाथ नागरी सहकारी पतसंस्थेचे १.अध्यक्ष व संस्थापक सदस्य २.मानद सचिव ३.उपाध्यक्ष ४.व्यवस्थापक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०४/२००९ ते दि.३१/०३/२०१६ रोजीचे कालावधी मध्ये श्री.नवलोबानाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.स.नं.५४२,घोरपडे पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील श्री.नवलोबानाथ नागरी सहकारी पतसंस्थेचे १.अध्यक्ष व संस्थापक सदस्य २.मानद सचिव ३.उपाध्यक्ष ४.व्यवस्थापक यांनी आपसात संगनमत करुन,श्री.नवलोबानाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.स.नं.५४२,घोरपडे पेठ,पुणे या पतसंस्थे मध्ये वेग-वेगळ्या कर्ज प्रकारानुसार नियमबाह्य कर्ज वाटप करणे,वेळेत कर्ज वसुल न करणे,ठेवी नसताना ठेवीची रक्कम व्याजासह परत करणे,प्रचलित व्याज दरापेक्षा जादा दराने ठेवी स्विकारुन त्यावर व्याज देणे, मुदत ठेव पावती देणे मात्र ती रक्कम संस्थेत जमा न करणे, मुदत ठेव तारण कर्ज ठेव परत करताना वसुल न करणे, संस्थेचे नुतनीकरण केल्याचे दर्शविणे ती रक्कम खर्च करणे तसेच बनावट कर्ज प्रकरणे तयार करुन कर्ज वितरण करणे अशा विविधप्रकारे सभासद व ठेवीदारांची घोर फसवणुक करुन एकुण ४,४९,७९,६७३/- रक्कम रुपयेचा पतसंस्थे मध्ये अपहार / गैरव्यवहार केलेला आहे. त्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी ठेव मुदत संपल्या नंतर सुध्दा त्यांना परत देता आलेल्या नाहीत. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विजयकुमार शिंदे ८६६८७७१६९० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २६५/१८,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | भाग्यश्री कारले,वय-४४ वर्षे,रा.पर्वती दर्शन,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम,अंगाने मजबूत,रंगाने गोरा,उंची अंदाजे ५ फुट ७ इंच,नेसणीस चॉकलेटी रंगाचा फुल बाह्याचा शर्ट,काळ्या रंगाची पॅन्ट अशा वर्णनाचा इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०७/२०१८ रोजी १५/३० वा. ते १६/०० वा. चे दरम्यान फोटो इमेज दुकाना समोर मुकुंदनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सुजय गार्डनवरुन पर्वती दर्शन येथे त्यांचे राहते घरी जात असताना,सदर ठिकाणी यातील नमुद वर्णनाचे इसमाने फिर्यादी यांना आवाज देवुन त्यांना बोलावुन घेवुन,मी या सोसायटी मध्ये राहण्यास असुन मी घर खाली करणार आहे. माझ्याकडे साड्या आहेत. तुमच्या अगोदर मी एका मावशीला चार साड्या दिल्या आहेत. तुम्हाला देखील साड्या देतो अशी बतावणी करुन फिर्यादीस तुम्ही तुमचे कानातील सोन्याचे दागीने हातात ठेवा,कारण मी तुम्हाला साड्या देत आहे असे सांगुन,फिर्यादीचा विश्वास संपादन करून,सदर इसमाने फिर्यादी यांचे अंगावरील सोन्याचे वेल जोड व टॉप जोड हातात घेवुन,त्याचे जवळील रूमालात काहीतरी बांधुन फिर्यादी यांचे हातात दिले. तसेच १००/-रू च्या नोटेमध्ये फिर्यादी यांचे कानातील वेल जोड व टॉप जोड बांधुन,फिर्यादी यांचे हातात दिल्याचे भासवुन साड्या घेऊन येतो असे सांगुन,फिर्यादीची दिशाभुल करुन सोन्याचे दागीने २५,०००/- रू किचे घेवुन जावुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. शेख ९६८९९३४२८६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ४९६/१८,भादविक ३५३,३५२,३३२,४२७,५०४,३४,महा.पो.अधि.का.क.११२/११७ |
| **फिर्यादी** | अशोक ठकावरे,पो.शि. निगडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.इमामुदीन तय्यबअली इनामदार,वय-२०,रा.जनता शाळे जवळ,दौंड,जि.पुणे २.योगेश रमेश माने,वय-२४,रा.गौतमनगर,दौंड,जि.पुणे ३.मोहम्मद सईद तय्यबअली इनामदार,वय-२४,रा. जनता शाळे जवळ,दौंड,जि.पुणे ४.विकास पांडुरंग डाळींबे,वय-२५,रा.जगदाळे वस्ती बारामती आऊटर दौड,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०१८ रोजी पहाटे ०३/१० वा. राठी हॉटेल मधील तिसरा मजला,रुम नं.३०५ चे समोरील मोकळया जागेत पॅसेज मध्ये स.नं.१६,राजे शिवाजीनगर चिखली,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे निगडी पो स्टे येथे रात्रपाळीसाठी कर्तव्यावर हजर असताना,त्यांना पोलीस नियंत्रण कक्षातुन राठी हॉटेल येथे काही इसम गोंधळ घालीत आहे असा संदेश प्राप्त झाल्यावर फिर्यादी व त्यांचे सहकारी पो.शि.गेंगजे हे सदर ठिकाणी गेले असता,यातील नमुद इसमांनी सदर ठिकाणी मोठयाने स्पिकर लावुन,आरडा-ओरड करीत असताना मिळुन आले. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांना स्पिकरचा आवाज कमी करण्यास सांगितल्याचे कारणा वरून सदर इसमांनी संगनमत करुन फिर्यादीस ‘‘तु कोण रे,तुझा संबंध काय’’असे बोलुन फिर्यादी व पो.शि.गेंगजे यांना अपशब्द वापरुन फिर्यादी यांचेकडील मोबाईल हॅन्डसेट घेवुन भिंतीवर जोरात आपटुन नुकसान करुन,फिर्यादी यांचा शासकीय गणवेश ओढुन त्यांना धक्का-बुक्की करून,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एस.डब्ल्यु.वाघमारे ९६०४५७१६२२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी पो स्टे २३६/१८,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | गंगाधर बोचकुरे,वय-६०,रा.घोडकाराजुरी,जि.बीड |
| **आरोपी** | नागेश चंदु जानराव,वय-३८,रा.लांडेवाडी वसाहत,भोसरी,पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिद.२४/०७/२०१८ रोजी सकाळी ०७/०० वा. चे पुर्वी लांडेवाडी वसाहत,भोसरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.छाया नागेश जानराव,वय-३० वर्षे हिचे लग्न तीचा पती नागेश चंदु जानराव,वय-३८,रा.लांडेवाडी वसाहत,भोसरी,पुणे या इसमा बरोबर १४ वर्षापुर्वी लग्न होवुन,ती १.गौरी,वय-११ वर्षे, २.जान्हवी,वय-०९ वर्षे व वैष्णवी,वय-०३ वर्षे या तीन मुलींसह सासरी नांदत असताना,तीचा पती नागेश याने दारू पिवुन येवुन स्वतःचे वयोवृध्द आई-वडील व त्याची पत्नी सौ.छाया हिस वेळोवेळी मारहाण करून,तीस घर खर्चाला पैसे न देता,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,सौ.छाया हिस तीचे राहते घराचे छताचे लोखंडी पाईपला साडीने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्हि.एस.साळुंखे ९५९४७७४२३८ |

## दि.२६/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४२५/१८,भादविक ३०७,३२३,५०४,३४,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | रिदवान आजीजी,वय-२४,रा.एनआयबीएम रोड,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०१८ रोजी २१/३० वा.लॅटिटुड सोसायटी समोर सार्वजनिक रोडवर एमआयबीएम रोडवर,कोंढवा-खुर्द,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे परदेशातील नागरीक असुन,त्यांचेमध्ये चालु असलेली भांडणे सोडविण्यासाठी फिर्यादी व साक्षीदार हे गेल्याचे कारणावरून त्याचा राग मनात धरून चिडुन जावुन,फिर्यादी व साक्षीदार अहमदजान नजमोद्दीन नज्म,वय-२६,रा.सर्वोदय सोसा. एनआयबीएम रोड,कोंढवा-खुर्द,पुणे यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून,अहमदजान यास चाकुने वार करून त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.आर.पवार ८८०५९८९४७२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**